| | |
|---|---|
| MHLA140020512025 | **<u>नियमित दिवाणी दावा : ४९९/२०२५</u>**<br>व्यंकट शंकर लिंबाळकर<br>विरुध्द<br>नारायण दिगंबर लिंबाळकर व इतर |

## <u>निशाणी १५ खालील आदेश</u>

**१.** प्रतिवादी नं.१ ते ५ यांनी प्रस्तुतच्या अर्जाद्वारे त्यांचे विरुध्द झालेला "No W.S."  चा आदेश रद्द होवून त्यांची कैफीयत अभिलेखावर घेणेकामी विनंती केली आहे. त्यामध्ये त्यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी हे दि. १९/०८/२०२५ रोजी त्यांचे विधीज्ञांमार्फत हजर झालेले आहेत. परंतु त्यांनी त्यांची कैफीयत मुदतीत दाखल न केल्यामुळे त्यांचे विरुध्द "No W.S." चा आदेश पारीत झालेला आहे. त्यांनी झालेला विलंब हा जाणून बुजून केलेला नाही. त्यामुळे त्यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

**२.** वादीने प्रस्तुत अर्जास अर्जाच्या पाठीमागे त्यांचे म्हणणे देवून अर्जास सक्त विरोध केला आहे. त्यामध्ये त्यांचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादींनी त्यांना असलेल्या मुदतीनंतर " W.S." दाखल केलेले आहे. त्यामुळे प्रतिवादींचा अर्ज नामंजूर करावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

**३.** अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला. अर्जाचे, प्रकरणाचे व दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र. १ ते ५ यांना दि. ०४/०८/२०२५ रोजी समन्स लागल्याचे दिसून येत आहे. तसेच प्रस्तुत प्रतिवादी हे दिनांक १९/०८/२०२५ रोजी वकीलांमार्फत हजर झाल्याचे तसेच त्यांना कैफीयत दाखल करणेस विलंब झाल्याचे दिसून येत आहे. नैसर्गिक न्यायतत्वाच्या अनुषंगाने प्रतिवादीं विरुध्द झालेला "No W.S."  चा आदेश रद्द करुन दावेस त्यांना त्यांची कैफीयत व म्हणणे दाखल करण्याची संधी देणे हे न्यायाच्या हेतूने योग्य होणार आहे. तसेच प्रस्तुतचा दावा हा वादीने अतिक्रमीत जमीनीचा ताबा

मिळणेकामी तसेच निरंतर मनाईकरिता दाखल केला आहे. त्यामुळे दाव्याचा निकाल हा गुणदोषावर लागण्याकरीता प्रतिवादींचा सदरचा अर्ज मंजूर करणे हे न्यायाच्या दृष्टीने योग्य होईल. परंतु प्रतिवादी यांना कैफियत दाखल करणेकरीता झालेला विलंबही विचारात घ्यावा लागेल. यावरुन एकंदरीत सर्व बाजूंचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

१. प्रतिवादींचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी रक्कम रु.५००/– (पाचशे रुपये मात्र) वादींना द्यावेत.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा खर्च न दिल्यास तो दावा खर्चात समाविष्ट करुन घेणेत यावा.

४. प्रतिवादी यांची कैफियत व म्हणणे आज रोजी वाचून दाखल करणेत येते.

Digitally signed by
SABALE SHITAL
DATTATRAY
Date: 2026.03.12
14:30:07 +0530

औसा
दिनांक : ११/०३/२०२६

**(शि. द. साबळे)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
औसा